दि. 24/02/2023

1) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# नालासोपाऱ्यात अवैध रिक्षांमुळेच वाहतूक कोंडी

**नालासोपारा :** नालासोपारा पश्चिमेकडील उड्डाणपुलाखाली अनधिकृत रिक्षांची रांग लावून वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण केला जात आहे. यामुळे नालासोपारा, निळेगाव, वसई विरार पालिकेच्या कार्यालयात जाणाऱ्या वाहनचालकांना तसेच रुग्णवाहिकांना, शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाताना वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे.



उड्डाणपुलाखाली लागलेली भलीमोठी रांग ही अधिकृत आहे, तर रस्त्यावर लावलेली ही रांग अनधिकृतपणे राजरोस प्रवाशांना घेऊन जात आहेत. येथील रिक्षा चालकांनी वाहतूक पोलिसांकडे अनेकदा तक्रारी केल्या. मात्र त्याचा काही एक उपयोग झाला नाही. या अनधिकृत रिक्षांना वाहतूक पोलिसांचा वरदहस्त असून एका रिक्षामागे १ हजार ते १५०० रुपये वसूल केल्याचा आरोप केला जात आहे. पोलिसांनी ठरवले तर एकही अनधिकृत रिक्षा रस्त्यावर दिसणार नाही. मात्र पोलीसच त्यांना प्रोत्साहन देत असून अधिकृत रिक्षावाले त्यांना जाब विचारण्यास गेल्यावर त्यांना आम्ही पोलिसांना पैसे देतो. त्यामुळे तुम्ही आमचे काही करू शकत नसल्याचे अनधिकृत रिक्षाधारक अधिकृत रिक्षाचालकांना सांगत आहेत. येथील रिक्षाचालक गणवेश न परिधान करता मुजोरी करत प्रवासी घेण्यासाठी त्यांची स्पर्धा असते. तक्रार केल्यावर दोन दिवस रिक्षा बंद असतात. मात्र पुन्हा तेच चित्र पाहायला मिळते. येथे एकही वाहतूक पोलीस नसतो. दरम्यान, वाहतूक विभागाचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक प्रशांत लांघी यांनी आमची कारवाई सुरूच आहे, असे उत्तर दिले.

2) लोकसत्ता पृ. पान क्र. 4

# गावठी कट्टा, काडतुसे जप्त

**वसई :** शस्त्र विक्री करण्यासाठी आलेल्या आरोपीला तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. आरोपीकडून गावठी कट्टा व दोन काडतुसे हस्तगत केली आहेत.

नालासोपारा पूर्वेच्या तुळींज स्मशानभूमीजवळ एक व्यक्ती शस्त्र विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याच अनुषंगाने तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने सापळा रचून आरोपीला अटक केली आहे. जियालाल जयस्वाल असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून एक गावटी कट्टा व दोन काडतुसे, असा ११ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. विनापरवाना शस्त्रजवळ ठेवल्याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक एम. डी. म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल व त्यांच्या पथकाने केली आहे.

3) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# पालिका अधिकारी असल्याचे सांगून खंडणी मागणाऱ्या दोघांना अटक

**नालासोपारा :** नालासोपारा पूर्वेकडील श्री अपार्टमेंट गावराई नाका येथील दुकानदाराकडून आम्ही पालिकेचे अधिकारी आहोत असे सांगून खंडणी मागणाऱ्या दोघांना पेल्हार पोलिसांनी अटक केली. अन्य दोघे फरार झाले असून त्यांचा शोध पेल्हार पोलीस घेत आहेत.

नालासोपारा गावराई नाका येथील गणेशसिंग खरवड यांच्या आशापुरा जनरल स्टोअर्समध्ये ईश्वर यादव, अविनाश पांडे, राकेश पांडे, ह्रतिक दुबे हे चौघे गेले व आम्ही पालिकेचे अधिकारी असल्याचे सांगून कागदपत्रे तपासण्याचे नाटक केले. तुमच्या परवान्याची मुदत संपली असून तुमच्यावर केस होईल आणि तुमच्या दुकानाचे लायसन रद्द करू, अशी धमकी देऊन ३ लाखांची खंडणी मागितली. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पेल्हार पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करून ईश्वर यादव व अविनाश पांडे यांना अटक केली.

दरम्यान, त्यांच्या ताब्यातील एसयूव्ही कार जप्त केली आहे. त्यांना गुरुवारी वसई न्यायालयात हजर केले असता त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. राकेश पांडे, ह्रतिक दुबे या फरार आरोपींचा शोध पेल्हार पोलीस घेत आहेत.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 24/02/2023

4) पुढारी पृ. पान क्र. 4

# कारवाईसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना कोंडले

## भाईंदरमध्ये विकासकासह ४ जणांवर गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेच्या एका इमारतीत विकासकाने अनधिकृतपणे बांधकाम केले होते. या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी गेले असता विकासकाने अधिकाऱ्यांसह पथकातील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, शिवीगाळ करून अर्धा तास इमारतीच्या आवारातील प्रवेशद्वाराला टाळे लावून कोंडून ठेवल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात बुधवारी विकासक व त्याच्या साथीदारासह ४ व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर पालिकेच्या प्रभाग कार्यालय १ हद्दीत सॉलिसिटर इमारतीमध्ये विकासक कल्पेश जैन, कुलदीप जैन, निखील जैन आणि त्याच्या साथीदारांनी बेकायदेशीररीत्या मॅकेनिकल पार्किंग उभारले होते. हे पार्किंग रहिवाशांना विकून त्याचठिकाणी मंदिराचेही काम सुरू असल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर नगररचना विभागाने मंजूर नकाशाव्यतिरिक्त बेकायदा बांधकाम झाल्याचे प्रभाग समिती १ च्या सहायक आयुक्त कांचन गायकवाड यांना कळविले.

प्रभाग समितीच्या कनिष्ठ अभियंत्यांनी त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता गायकवाड यांनी विकासक व सल्लागार यांना मेकनिकल पार्किंगचे बेकायदा बांधकाम त्वरित काढून टाकण्याची नोटीस बजावली होती. त्यानंतरही विकासकाने हे बांधकाम काढून टाकले नाही. त्यामुळे महापालिका अधिकारी पथकासह कारवाई करण्यासाठी गेले होते.

कारवाई करण्यासाठी गेलेल्या प्रभाग अधिकारी कांचन गायकवाड, अभियंता वैभव कुलथे, दिग्विजय देवरे आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना धक्काबुक्की व शिवीगाळ करून इमारतीच्या मेन गेटला कुलूप लावून तब्बल अर्धा तास विकासकांनी डांबून ठेवल्याचा प्रकार घडला आहे. अधिकारी यांनी पोलीस ठाण्यात फोन करून घडनेची माहिती दिली असता पोलीस घडनास्थळी पोहोचून त्यांची सुटका केली. पालिका अधिकाऱ्यांना धक्काबुक्की व शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात विकासकासह ४ जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

5) लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# अपहृत चिमुकलीची बिहारमधून सुटका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा येथून अपहरण करण्यात आलेल्या दीड वर्षाच्या मुलीची बिहारमधून सुखरूप सुटका करण्यात आली आहे. मुलीचे अपहरण करणारा आरोपी सुरेंद्र कुमार मंडल याला अटक करण्यात आली आहे. त्याने नेमके का अपहरण केले ते अद्याप स्पष्ट झालेले नाही.

१५ फेब्रुवारी रोजी नालासोपारा पूर्वेच्या आचोळे डोंगरी परिसरात राहणाऱ्या सानवी बिडलानी या मुलीचे अपहरण करण्यात आले होते. त्याच परिसरात सुरक्षारक्षकाचे काम करणाऱ्या सुरेंद्र कुमार मंडल याने मुलीने फिरण्यासाठी नेतो, असे सांगून पळवून नेले होते. मुलीच्या शोधासाठी आचोळे पोलीस तसेच गुन्हे शाखा २ आणि गुन्हे शाखा ३ चे पथक संयुक्तरीत्या काम करत होते.

आरोपीची ओळख पटली होती. त्याच्या मोबाइलचा ठावठिकाणी आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी बिहारमधून मुलीची सुखरूप सुटका करून आरोपी मंडल याला अटक केली. त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. नेमके आरोपीने मुलीचे अपहरण का केले ते चौकशीतून समोर येईल, अशी माहिती आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी सांगितले.

6) पुढारी पृ. पान क्र. 4

# स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसायावर कारवाई

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

नयानगर पोलीस टाणे हद्दीत स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या वर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कारवाई केली आहे. कारवाई करून दोन पीडित मुलींची सुटका केली आहे.

नयानगर पोलीस टाणे हद्दीतील शांती नगर सेक्टर ५, भारत गॅस गोडाऊन, शांती प्लाझा समोरील एका इमारतीमध्ये सॉफ्ट टच स्पा सेंटरमधील मसाज सेंटरचा नोकर मसाजच्या नावाखाली अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसाय करायला लावत असल्याची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने कसून चौकशी करून सॉफ्ट टच स्पा सेंटरमध्ये सापळा रचून मसाज सेंटरवर छापा टाकला. त्यावेळी मसाज सेंटरचा मॅनेजर आणि नोकराला ताब्यात घेतले. १७ वर्षाची अल्पवयीन मुलगी आणि २४ वर्षांची पीडित मुलगी यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका केली. चौकशी केली असता मसाज सेंटरचे मालक, व्यवस्थापक आणि नोकर हे मसाजच्या नावावर अनेक, महिन्यांपासून वेश्याव्यवसाय चालवत होते.

### पोलिसांचे आवाहन

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गैरधंद्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकाने कारवाईसाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. आपल्या आजूबाजूला कुठल्याही प्रकारे गैरकृत्य होत असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधा, असे आवाहन पोलीस आयुक्त मधुकर पाण्डये यांनी नागरिकांना केले आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 24/02/2023

7) लोकसत्ता पु. पान क्र. 1

# पोलीस भरती प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण

## शारीरिक चाचणी उत्तीर्ण उमेदवारांच्या गुणांची यादी जाहीर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. पोलीस भरतीसाठी शारीरिक चाचणी दिलेल्या उमेदवारांच्या गुणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. हरकती नोंदविण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. पात्र उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर लेखी परीक्षा घेतली जाणार आहे.

### पोलीस भरती

- एकूण पदे- ९९६
- आलेले अर्ज- ७१ हजार
- पुरुष ५९,८४७
- महिला १२,१०४
- चाचणीला हजर ४९,४७९
- गैरहजर २२,४७२

पोलीस आयुक्तालयातर्फे सुरू असलेली पोलीस भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पोलीस शिपाई आणि चालकपदाच्या एकूण ९९६ जागांसाठी २ जानेवारीपासून ही भरती प्रक्रिया भाईंदर येथील सुभाषचंद्र बोस मैदानात सुरू होती. प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली होती. त्यामध्ये शारीरिक चाचणी पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या गुणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये हरकती नोंदविण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रकाश गायकवाड यांनी दिली. कुठलाही अनुचित प्रकार न घडता भरती प्रक्रिया सुरळीत पार पडली. भरती प्रक्रिया पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी अत्याधुनिक पद्धत वापरण्यात आली. प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात आली होती. दररोज सकाळी साडेपाच वाजता उमेदवारांची बायोमॅट्रिक नोंद केली जात होती. कुठलाही गैरप्रकार होऊ नये यासाठी ५० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते तसेच चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

8) लोकसत्ता पु. पान क्र. 1

# भाईंदर-वसई पोलीस आयुक्तालयात विधि अधिकाऱ्यांची नियुक्ती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात प्रथमच विधि अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिमंडळ १ साठी ॲड. दीप्ती भट, तर परिमंडळ २, ३ साठी ॲड. रोहन खाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली. तेव्हापासून विधि अधिकारी नव्हता. परिमंडळ १ (मीरा-भाईंदर) साठी ॲड. दीप्ती भट, तर परिमंडळ २ आणि ३ (वसई विरार) साठी ॲड. रोहन खाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती १ फेब्रुवारीपासून पुढील ११ महिन्यांसाठी लागू करण्यात आली आहे.

पोलिसांना कायदेशीर मदत देऊन अडचणी दूर करणे, गुन्ह्यातील दोषसिद्धी वाढविण्यासाठी पोलिसांना पुरावे आणि इतर तांत्रिक कामांसाठी मदत करण्याची जबाबदारी या विधि अधिकाऱ्यांना देण्यात आली आहेत. ॲड. खाडे हे वसईतील जुने आणि अनुभवी वकील असून मागील १७ वर्षांपासून पोलिसांना कायदेशीर मदत प्रदान करत आहेत.

9) म.टा.पु. पान क्र. 1

# रेल्वे आरक्षणाचा अर्ज भाईंदरमध्ये गुजरातीत

**म.टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

केंद्र सरकारच्या आदेशानुसार, रेल्वे आरक्षणाचा अर्ज इंग्रजी व स्थानिक भाषेत म्हणजेच मराठीत देणे गरजेचे आहे. असे असताना, मिरा रोड व भाईंदर रेल्वे स्थानकात इंग्रजीसह गुजराती भाषेतील आरक्षण अर्ज दिला जात असल्याचे सांगत मनसेने संताप व्यक्त केला आहे. हा अर्ज मराठीत उपलब्ध करून द्यावा, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

मिरा रोड व भाईंदर या रेल्वे स्थानकांमध्ये 'आरक्षण केंद्रां'वर दररोज शेकडो प्रवासी तिकीट आरक्षित करण्यासाठी येतात; मात्र येथे तिकीट आरक्षणासाठी दिला जाणारा अर्ज हा अनेकदा इंग्रजीत आणि गुजराती भाषेत असतो. त्यामुळे मराठी भाषकांनी संताप व्यक्त केला आहे. काहींनी ही बाब मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानुसार मनसेचे जिल्हाध्यक्ष हेमंत सावंत व इतर पदाधिकाऱ्यांनी भाईंदर रेल्वे स्थानकात कार्यरत असणाऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांची गुरुवारी भेट घेतली. केंद्र सरकारच्या आदेशानुसार, इंग्रजीच्या जोडीनेच स्थानिक भाषेत म्हणजेच मराठीतही तिकीट अर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे आरक्षण केंद्रांवर तात्काळ मराठीतील अर्ज उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू, त्यावेळी उद्भवणाऱ्या परिस्थितीला रेल्वे प्रशासन जबाबदार राहील असा इशाराही पत्राद्वारे देण्यात आला आहे. यावर रेल्वे अधिकाऱ्यांनी तात्काळ मराठीत अर्ज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्याचे सावंत यांनी सांगितले.

### मनसेचा आंदोलनाचा इशारा



Scanned with CamScanner

दि. 24/2/2023

10) सामना पान क्र.6

इन्स्टाग्रामवर नोकरीचे आमिष दाखवून अपहरण

# वसईतील तरुणीला राजस्थानात विकले

वसई, दि. २३ (सा.वा.) – इन्स्टाग्रामवर मैत्री करणे एका तरुणीला चांगलेच महागात पडले आहे. नोकरीचे आमिष दाखवून २७ वर्षीय तरुणीला राजस्थानमध्ये दोन लाखांना विकल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अर्नाळा पोलिसांनी राजस्थान येथून तरुणीची सुखरूप सुटका केली असून आरोपी चेतन भारती याच्या मुसक्या आवळल्या आहेत. तर अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

क्राईम फाईल

वसईच्या कळंब येथे राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीची डिसेंबर महिन्यात चेतन भारती याच्याशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली. त्याने राजस्थानमध्ये पोलीस खात्यात नोकरी देण्याचे आमिष दाखवले. १५ जानेवारी रोजी पीडित तरुणी राजस्थानला गेली. मात्र नोकरी न देता चेतनने तिला दोन लाख रुपयांत दिनेश पुरीला विकले. त्यानंतर जबरदस्तीने तिचे लग्न लावून तिच्यावर वारंवार अत्याचार केला. पीडित तरुणीला राजस्थानमध्येच डांबून ठेवण्यात आले होते. दरम्यान तिच्या नातेवाईकांनी अर्नाळा पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरू केला. मात्र एक दिवस महत्प्रयासाने तिने मोबाईल मिळवला आणि बहिणीशी संपर्क साधला. तिने याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर अर्नाळा पोलीस राजस्थानला पोहोचले आणि तरुणीची बाडमेर जिल्ह्यातील बालोत्रा येथून सुटका केली. याप्रकरणी पोलिसांनी चेतनला अटक केली. तर अन्य तीन आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

11) लोकमत पान क्र.2

# पेट्रोल बॉम्बप्रकरणी भाजप पदाधिकारी अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आयर्नमॅन स्पर्धा विजेता हार्दिक पाटील यांच्या घरावरील पेट्रोल बॉम्ब हल्ल्यातील आरोपी भाजप पदाधिकारी कांचन ठाकूर याला विरार पोलिसांकडून बुधवारी संध्याकाळी अटक करण्यात आली आहे.

आयर्नमॅन हार्दिक पाटील यांच्या घरावर ४ मे २०२१ रोजी पेट्रोल बॉम्बचा मारा करण्यात आला होता. विरार पोलिसांनी या प्रकरणी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न, कट कारस्थान रचणे या कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आतापर्यंत ७ आरोपींना अटक केली असून यातील दोन आरोपी फरार आहेत. कांचन ठाकूरला कोर्टाने अंतरिम जामीन दिला होता, पण तो फेटाळल्याने या फरार आरोपीला अटक करण्याची मागणी हार्दिक पाटील यांनी पत्रकार परिषदेत काही महिन्यांपूर्वी केली होती.

भारताचे प्रतिनिधित्व जगातील स्पर्धेत करत असून माझ्याच जिवाला धोका निर्माण झाला आहे. फरार आरोपींना पकडण्याची मागणी करावी लागणे ही शोकांतिका असल्याचे मत हार्दिक पाटील यांनी त्यावेळी व्यक्त केले होते. दरम्यान, कांचन ठाकूरला गुरुवारी वसई न्यायालयात विरार पोलिसांनी हजर केल्यावर सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

दि. 24/02/2023

12) पुण्यनगरी पान क्र. 2

# गुन्हा रद्द करण्यासाठी शिझानची उच्च न्यायालयात धाव

**तुनिषा आत्महत्या प्रकरण**

**। मुंबई :** छोट्या पडद्यावरील अभिनेत्री तुनिषा शर्मा हिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या आरोपाप्रकरणी अटकेत असलेला अभिनेता शिझान खान याला गुन्हा रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेत दुरुस्ती करण्यास उच्च न्यायालयाने परवानगी दिली. न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी ही



परवानगी देताना याचिकेची सुनावणी दोन आठवडे तहकूब ठेवली.

तुनिषा शर्मा आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेल्या शिझानने उच्च न्यायालयात धाव घेऊन जामिनाबरोबरच गुन्हा रद्द करण्यासाठी दोन स्वतंत्र याचिका उच्च न्यायालयात दाखल केल्या. पोलिसांच्या तपासाला स्थगिती देण्याबरोबरच आरोपपत्र दाखल करण्यास मनाई करावी, अशी विनंती केली होती.

दरम्यान, पोलिसांनी आरोपपत्र दाखल केल्याने याचिकेत दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली. न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने ही परवानगी देताना याचिकेची सुनावणी दोन आठवडे तहकूब ठेवली.

13) पुढारी पान क्र. 5

# तुनिषा आत्महत्याप्रकरणी वालीव पोलिसांना आज अंतिम बाजू सादर करण्याचे आदेश

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी शिजान खानच्या जमीन अर्जावर गुरुवारी वसई सत्र न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणी करताना वसई सत्र न्यायालयाने वालीव पोलिसांना आज शुक्रवारी.२४ फेब्रुवारी २३ ला त्यांची अंतिम बाजू सादर करण्यास सांगितली आहे. त्या नंतरच या प्रकरणी न्यायालयात सुनावणी कधी सुरु होईल हे न्यायालय ठरवेल. त्यांनी या अगोदर चार्जशीट फाईल केली आहे. एफ आयआर मध्ये जे सांगितले आहे त्या व्यतिरिक्त त्यांच्या कोणतीही केस नाही आहे. त्यामुळे आंम्ही आशेवर आहोत. असे शिजान खानच्या वकिलांनी सांगितले?

वसई न्यायालयात आरोपी शिजान खानच्या जामीन अर्जावर पुन्हा सुनावणी झाल्यानंतर तुनिशाच्या वकिलांनी वालीव पोलिसांनी अतिशय चांगल्याप्रकारे पोलीस तपास केला आहे. वालीव पोलिसांनी वसई न्यायालयात दाखल केलेल्या आरोप पत्रामुळे शिजान खानच्या अडचणीत वाढ झाली आहे. असल्याचे तुनिषा शर्माच्या वकिलांनी सांगितले. आता आजच्या सुनावणीत वसई सत्र न्यायालय काय निर्णय देते हे पाहावे लागेल शिजानला बेल कि जेल हे समजण्याची शक्यता आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

हिन्दी दैनिक
# सौराष्ट्र भारत
SBN सौराष्ट्र भारत
E-mail:saurashtrabharat2021@gmail.com

BE
ALL TYPES OF INSURANCE SOLUTIONS AGENCY
SERVICE
Motor Insurance • Health Insuance • Life Insurance • Term Insuance • Home Loan motgage Loan & Business Loan Car Loan
Mr. Rajiv Shukla 9555334100
Mr. Yogesh R.Shukla 9594085021

वर्ष-02 | अंक-166 | (हिन्दी दैनिक) | मुम्बई, बुधवार, 22 फरवरी, 2023 | पृष्ठ- 8 | मूल्यः दो रुपया

# मीरा-भायंदर कार्यक्षेत्र मे स्वच्छता मे बेहतरीन कार्य के लिए सम्मान समारोह संपन्न

## ⇨मीरा भायंदर मनपा आयुक्त और मीरा-भाईदर वसई-विरार पुलिस आयुक्त की उपस्थिति में आयोजन संपन्न

गणेश पाण्डेंय

भाईदर। 21 फरवरी को मीरा भायंदर मनपा आयुक्त एवं प्रशासक दिलीप ढोले और मीरा भाईदर बसई बिरार पुलिस कमिश्नर मधुकर पाण्डेंय की उपस्थित मे स्वच्छता रैंकिंग समारोह का समापन किया गया।इस अवसर पर अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे,उपायुक्त रवि पवार, पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, उपायुक्त (शिक्षा) कल्पिता पिंपले, मनपा अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी,सफाई कर्मचारी उपस्थित थे।मीरा भायंदर कार्यक्षेत्र में आने वाले स्कूलों, अस्पतालों, होटलों, सरकारी कार्यालयों, बाजार संघों और सोसायटियों को मनपा के माध्यम से स्वच्छता रैंकिंग में भाग लेने के लिए आमंत्रित किया गया था।इसमें प्रत्येक प्रतियोगी को उसके मोहल्ले की साफ-सफाई, प्रतिष्ठान की साफ-सफाई, कचरे की छंटाई, साफ-सफाई स्टाफ, कंपोस्टिंग, शौचालय की साफ-सफाई के हिसाब से रैंकिंग दी गई। रैंकिंग के आधार पर मनपा क्षेत्र के स्कूलों,अस्पतालों, होटलों, सरकारी कार्यालयों, बाजार संघों और सोसायटियों के विजेता घोषित किए गये और आयुक्त और पुलिस कमिश्नर ने सम्मानित किया।इसके अंतर्गत स्वच्छ होटल रैंकिंग में होटल एक्सप्रेस इन ने पहला, वेस्टर्न होटल ने दूसरा और दिल्ली दरबार ने तीसरा स्थान हासिल किया।होटल साई पैलेस और जीसीसी होटल को बेस्ट सेल्फ सस्टेनेबल का दर्जा दिया गया। स्वच्छ स्कूलों की रैंकिंग में नाजरेथ स्कूल को पहला, एनएच स्कूल को दूसरा, काशीगांव स्कूल को तीसरा स्थान मिला।इसमें सेवन स्क्वायर एकेडमी और होली क्रॉस स्कूल को बेस्ट सेल्फ सस्टेनेबल का दर्जा दिया गया।स्वच्छ मार्केट रैंकिंग में मीरा रोड फिश मार्केट को पहला, रामदेव पार्क मार्केट को दूसरा,मंगल मार्केट को तीसरा स्थान मिला है। स्वच्छ हॉस्पिटल रैंकिंग में भक्ति वेदांता हॉस्पिटल पहले, फैमिली केयर हॉस्पिटल दूसरे और मेडिटेक हॉस्पिटल तीसरे स्थान पर रहा। इसमें वॉकहार्ट अस्पताल और इंदिरा गांधी अस्पताल को बेस्ट सेल्फ सस्टेनेबल का दर्जा दिया गया। स्वच्छ समाज रैंकिंग में प्रथम स्थान जे.पी. इंफ्रा ने दूसरा स्थान मारी गोल्ड,तीसरा स्थान कृतिका सोसायटी ने हासिल किया।इसमें भैरव रेजिडेंसी व इंद्रप्रस्थ सोसायटी को बेस्ट सेल्फ सस्टेनेबल की श्रेणी में पुरस्कृत किया गया। स्वच्छ सरकारी कार्यालयों की रैंकिंग में पुलिस कमिश्नरेट को पहली रैंक, वार्ड कमेटी नंबर 6 को दूसरी रैंक मीरा रोड स्टेशन को तीसरी रैंक मिली है.इसमें उत्तन सागरी पुलिस चौकी व मनपा कमेटी नंबर 3 व 5 को बेस्ट सेल्फ सस्टेनेबल की श्रेणी में पुरस्कृत किया गया।पुलिस आयुक्त मधुकर पांडेय ने मनपा के माध्यम से स्वच्छता को लेकर चलायी जा रही गतिविधियों की सराहना की उन्होने पालिका के आयुक्त और स्वच्छता अधिकारियों की शहर को स्वच्छ रखने के लिए की गई मेहनत की सराहना करते हुए संतोष व्यक्त किया। शहर की साफ-सफाई और सफाई कर्मचारियों का अहम योगदान बताते हुए पुलिस आयुक्त ने कहा कि स्वच्छता के महत्व को समझते हुए मनपि के माध्यम से शहर को हमेशा साफ-सुथरा व सुंदर बनाए रखने के लिए विभिन्न गतिविधियों का संचालन किया जाता रहा है. साथ ही शहर को स्वच्छ रखने में सफाई कर्मचारियों का बहुमूल्य योगदान है,लेकिन इसके साथ ही सभी नागरिक भी शहर को स्वच्छता रखने मे सहयोग दे ताकि मीरा भायंदर शहर के सभी आम नागरिकों में जागरूकता साफ सफाई के प्रति हो।




Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-251 मुंबई, शुक्रवार 24 फरवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# पुलिस आयुक्तालय में पहली बार सीधी भर्ती

**वसई :** मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय सीमा में पुलिस कांस्टेबल और ड्राइवर पदों के लिए सीधी भर्ती प्रक्रिया 2 जनवरी से शुरू हो चुकी है, अब लड़के और लड़कियों का शारीरिक परीक्षण पूरा हो चुका है. पुलिस आयुक्तालय की स्थापना के बाद पहली बार सीधी भर्ती की जा रही है।यह भर्ती 996 पदों पर होने जा रही है।इन पदों पर करीब 71 हजार आवेदन प्राप्त हुए हैं।प्राप्त 71 हजार 951 आवेदनों में 59 हजार 847 पुरुष और 12 हजार 104 महिला अभ्यर्थी शामिल हैं।पात्र आवेदकों में से कुल 49,479 ने भर्ती प्रक्रिया में अपनी उपस्थिति का संकेत देते हुए फील्ड फिजिकल टेस्ट पूरा किया है, फील्ड फिजिकल टेस्ट में जहां 35,956 कैंडिडेट्स क्वालीफाई हुए हैं, वहीं फिजिकल टेस्ट में 13,523 कैंडिडेट्स फेल हुए हैं।भर्ती के दौरान कदाचार रोकने और अभ्यर्थियों पर नजर रखने के लिए करीब 50 कैमरे लगाए गए हैं, भर्ती प्रक्रिया का संचालन करने वाली कंपनी के सीसीटीवी, कैमरों और हैंडीकैम को फिल्माया गया है, इस वजह से पूरी प्रक्रिया पर कैमरों की पैनी नजर रहती है, यह प्रक्रिया सोमवार 2 जनवरी 2023 से भायंदर पश्चिम के नेताजी सुभाष चंद्र बोस मैदान में शुरू की गई है, चूंकि भर्ती प्रक्रिया पहली बार आधुनिक तकनीक की मदद से की जाएगी, इसलिए हर अभ्यर्थी में कंप्यूटर चिप लगाई गई है, और हर उम्मीदवार को कंप्यूटर में दर्ज किया गया है, अभ्यर्थियों के नामांकन की प्रक्रिया सुबह साढ़े पांच बजे शुरू हुई।इसमें प्रत्येक अभ्यर्थी की बायोमैट्रिक हाजिरी ली जाती थी।



Scanned with CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

# गांजाचा साठा जप्त

नालासोपारा : नालासोपारा येथे गांजाचा साठा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. वैतीवाडी येथे २१ फेब्रुवारीला रात्री दहाच्यासुमारास आरोपी संजय तुसागड (वय ४०) याच्या ताब्यात आचोळे पोलिसांना बारा हजार रुपये किमतीचा ३५० ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला होता. बुधवारी आचोळे पोलिसांनी एनडीपीएस ॲक्टखाली गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 24, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# १३,५२३ उमेदवार ठरले पोलिस भरतीत अपयशी

## शारीरिक चाचणीत ३५,९५६ जण पात्र



अत्यंत कडेकोट पोलिस बंदोबस्तात व इन कॅमेरा पोलिस भरतीची शारीरिक चाचणी पार पडली.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयातील पहिली पोलिस भरतीची शारीरिक चाचणी भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस या मैदानात अत्यंत कडेकोट पोलिस बंदोबस्तात व इन कॅमेरा पार पडली. शारीरिक चाचणीत ४९ हजार ४७९ उमेदवारांपैकी ३५ हजार ९५६ उमेदवारांनी आपला फिटनेस दाखवून पात्र झाले, तर १३ हजार ५२३ उमेदवार अनफिट झाल्याने त्यांचे पोलिस बनण्याचे स्वप्न भंगले आहे. पोलिस भरती ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली झाल्याने भरती प्रक्रियेत शंभर टक्के पारदर्शकता येऊन इतर गैरप्रकारांनाही आळा बसला आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील प्रथम भरती प्रक्रियेला व शारीरिक चाचणीला २ जानेवारीपासून सुरुवात झाली होती व २२ फेब्रुवारीला सांगता झाली. शिपाई आणि वाहन चालक पदांच्या ९९६ जागांसाठी भरती होणार असून त्यासाठी ७४ हजार ४५८ इच्छुक उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. त्यात १२ हजार १०४ महिला तर ५९ हजार ८४७ पुरुष उमेदवारांचा समावेश होता. या भरती प्रक्रियेत इंजिनिअर, डॉक्टर, एमबीए, एमएस्सी झालेल्या तरुणांनी आपले नशीब आजमावले आहे. शिक्षण घेतलेल्या उच्चशिक्षितांचे प्रमाण मोठे असल्याने भरती प्रक्रियेत सहभागी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. ९९६ जागांच्या भरतीसाठी ज्या इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते त्यापैकी २२ हजार ४७२ अर्जदार आले नाहीत. त्यामुळे अर्ज करून सुद्धा शारीरिक चाचणीसाठी न आलेल्यांची संख्यादेखील मोठी आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# पेट्रोल बॉम्बप्रकरणी भाजप पदाधिकारी अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आयर्नमॅन स्पर्धा विजेता हार्दिक पाटील यांच्या घरावरील पेट्रोल बॉम्ब हल्ल्यातील आरोपी भाजप पदाधिकारी कांचन ठाकूर याला विरार पोलिसांकडून बुधवारी संध्याकाळी अटक करण्यात आली आहे.

आयर्नमॅन हार्दिक पाटील यांच्या घरावर ४ मे २०२१ रोजी पेट्रोल बॉम्बचा मारा करण्यात आला होता. विरार पोलिसांनी या प्रकरणी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न, कट कारस्थान रचणे या कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आतापर्यंत ७ आरोपींना अटक केली असून यातील दोन आरोपी फरार आहेत. कांचन ठाकूरला कोर्टाने अंतरिम जामीन दिला होता, पण तो फेटाळल्याने या फरार आरोपीला अटक करण्याची मागणी हार्दिक पाटील यांनी पत्रकार परिषदेत काही महिन्यांपूर्वी केली होती.

भारताचे प्रतिनिधित्व जगातील स्पर्धेत करत असून माझ्याच जिवाला धोका निर्माण झाला आहे. फरार आरोपींना पकडण्याची मागणी करावी लागणे ही शोकांतिका असल्याचे मत हार्दिक पाटील यांनी त्यावेळी व्यक्त केले होते. दरम्यान, कांचन ठाकूरला गुरुवारी वसई न्यायालयात विरार पोलिसांनी हजर केल्यावर सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

Mumbai Main
Page No. 4 Feb 24, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

## जानेवारीमध्ये सर्वोत्कृष्ट तपास

# आयुक्तांकडून सहा पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सहा पोलीस अधिकाऱ्यांना जानेवारीत विविध गुन्ह्यांचा छडा लावल्याने पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते 'सर्वोत्कृष्ट उकल' (बेस्ट डिटेक्शन)चा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात गुन्हे शाखा १, २, ३, सायबर शाखा तसेच वालीव आणि पेल्हार पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

शहरात घडणाऱ्या क्लिष्ट आणि अवघड गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना दर महिन्याला 'सर्वोत्कृष्ट उकल'चा पुरस्कार देऊन गौरविण्यात येतो.

### फसवणूक करणाऱ्या टोळ्या जेरबंद

बनावट विमाच्या नावाने देशभर नागरिकांना गंडा घालणाऱ्या चौघा जणांना सायबर कक्षाने अटक करून ३२ गुन्हे उघडकीस आणले होते. पेल्हार पोलिसांनी एटीएम कार्डाची अदलाबदल करून नागरिकांची फसवणूक करणारी चार जणांची टोळी जेरबंद केली होती. या टोळीने १६ गुन्हे केल्याचे उघडकीस आले होते. या कामागिरीबद्दल सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजीत गुंजकर आणि पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्धे यांचा सन्मान करण्यात आला.

मीरा रोडमध्ये अंकुश राज (वय २०) याची हत्या करण्यात आली होती. या हत्येचा तपास करून आठ आरोपींना गजाआड केल्याबद्दल मीरा रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल व गुन्हे शाखा १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांचा सन्मान करण्यात आला. दुसऱ्या घटनेत गोरेगावमधील महिलेने आपल्या पतीची सुपारी देऊन हत्या घडवून मृतदेह नायगाव येथे फेकला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा २ने आरोपींना अटक केली. त्याबद्दल गुन्हे शाखा २चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहुजी रणावरे यांचा सन्मान करण्यात आला.

विरार येथील एका घरफोडीचा तपास करून गुन्हे शाखा ३च्या पथकाने एका टोळीला अटक केली होती. या टोळीने घरफोडीचे १४ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. या तपासाबद्दल गुन्हे शाखा ३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांना गौरवण्यात आले. तसेच शहरातील गटारांवरील झाकणे चोरणाऱ्या पाच जणांच्या टोळीला वालीव पोलिसांनी अटक केली होती. या टोळीमुळे वसई, मुंबई आणि ठाणे परिसरांतील गुन्हे उघडकीस आणले होते. या कामगिरीबद्दल वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांचा उत्कृष्ट उकल केल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

लोकसत्ता Wed, 22 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71749715

Scanned with CamScanner